# ‘छात्र प्रबोधन’ अंकाच्या सर्व सभासदांना वाढदिवसानिमित्त पाठविली जाणारी काही शुभेच्छापत्रे !



॥श्री॥

छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.
☎ (०२०) ४४७७६११, ४४७८०९५

वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

सध्या अनेक समारंभात पुरवाढे छोटे रोप भेट म्हणून देण्याची चांगली पद्धत आहे. भेट देणाऱ्याची आठवण ठेवत ते रोप वाढवण्यात एक वेगळाच आनंद मिळतो. त्यामुळे निसर्गाशी जवळीक साधत एक प्रकारे पर्यावरणाला मदतच होत असते. बेसुमार होणारी वृक्ष तोडणी, व त्या प्रमाणात वृक्ष संवर्धन होत नसल्यामुळे प्रदुषणाचा प्रश्न उग्र रूप धारण करत आहे. आपले सर्व जीवनच वृक्षांवर अवलंबून आहे असे म्हटले तरी वावगे ठरू नये. अशा परिस्थितीत कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त आनंद देणारी ही अनमोल भेट निश्चितच आनंददायी ठरावी. आपल्या वाढदिवसाला कमीतकमी पाच जणांना रोप देऊन



छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.
☎ (०२०) ४४७७६११, ४४७८०९५

प्रिय,
वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

अमाप उत्साह, अफाट शक्ती, नवनवीन कल्पना या सगळ्याचं एकत्रीकरण म्हणजे तुझा हा वाढदिवस. खूप काही मिळवावं, पराक्रम करावा. मित्रांबरोबर हा सगळा आनंद साजरा करावा असं अगदी स्वाभाविकपणे वाटत असतं. पण या सगळ्यालाच कुठे तरी संयमाचीही जोड असायला लागते. खाली लिहिलेल्या कवितेत तुला हाच आशय सापडेल.

स्वप्न पाहणारे डोळे आणि साकारणारे हात दे,
माझ्या सुंदर ध्येयाला माझ्या माणसांची साथ दे,
खुशाल भिरकावून चिंता भीती असा न्यारा थाट दे,
खाच खळग्यांना पार करणारी समर्थ समृद्ध वाट दे,



छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.
☎ (०२०) ४४७७६११, ४४७८०९५

प्रिय
वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

सध्या आपली मराठी भाषा मोठ्या प्रमाणावर प्रदुषित होताना आढळते आहे. बोलतांना आणि लिहितांना परभाषेतील शब्दांचा वापर आपण अगदी सहजपणे करीत असतो. त्याबद्दल कोणत्याही प्रकारची खंत किंवा कमीपणाही आपल्याला वाटत नाही. याबाबत वेळीच जागरूकता दाखविली नाही; तर आपल्या मराठी भाषेचं मूळ स्वरूप आणि सौंदर्य नाहीसे होईल. आपण आपल्याकडून जास्तीत जास्त मराठी शब्द वापरण्याचा निश्चय करू शकतो. परभाषेवर प्रभुत्व जरूर मिळवावं पण म्हणून स्वभाषेला कमी लेखू नये. त्याचा यथार्थ अभिमान आपल्याला असायला हवा आणि तो दैनंदिन वागण्याबोलण्यातून दिसायलाही हवा, असे मला वाटते.



छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.
☎ (०२०) ४४७७६११, ४४७८०९५

प्रिय,

तुझा वाढदिवस खूप आनंदात जावो, वाढदिवसाला फुलांचा गुच्छ देण्याची चांगली पद्धत आहे, नाही का? सतत फुलत राहण्याचा, सुगंध पसरविण्याचा आणि दुसऱ्याला आनंद देण्याचा संदेश ही फुले आपल्याला देत असतात. तू देखील गुणांनी मोठा हो,
तुझ्या यशाचा आणि पराक्रमाचा सुगंध
सगळीकडे पसरु दे, त्यामुळे सर्वांनाच
आनंद होईल, हो ना!
पत्र पाठवणार ना!

सभासद क्रमांक व गावाचे नाव पण कळव